# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 06 March 2025
## Time 01.00 to 01.05 PM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ०६ मार्च २०२५ दुपारी १.०० वा.

****

विधानपरिषदेत आज राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर चर्चा पुढे सुरू झाली. भाजप गटनेते प्रवीण दरेकर यांनी चर्चेची सुरुवात करत महायुती सरकारच्या कार्याचा उल्लेख केला. महाराष्ट्र सरकार सीमावर्ती मराठी भाषिकांच्या पाठीशी ठामपणे उभं आहे, तसंच, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याने गुंतवणुकीत पुन्हा पहिलं स्थान मिळवलं असून, सरकारचा रोडमॅप राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये प्रतिबिंबित झाला असल्याचं, दरेकर यांनी नमूद केलं.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या चर्चेत सहभाग घेत, सरकार जनतेच्या सेवेसाठी कुठेही कटीबद्ध नाही, असा आरोप केला. दावोसमध्ये झालेले करार म्हणजे राज्याची फसवणूक असल्याचं ते म्हणाले. राज्याचं प्रशासन ढेपाळलेलं असल्याचं सांगून त्यांनी लाडकी बहिण योजनेसह अनेक योजनांवर टीका केली. नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्यापही पूर्ण मदत दिली नसल्याचं दानवे यांनी सांगितलं. राज्यपालांच्या भाषणावर खेद व्यक्त करत असल्याचं ते म्हणाले.

भाजपचे प्रसाद लाड यांनी दानवे यांच्या आरोपांचं खंडन केलं. मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचा उल्लेख करत, सर्व विभागांचं कामकाज सुरळीत होत असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

राज्याची, राज्य शासनाची भाषा मराठी असून, राज्यात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषा आलीच पाहिजे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत स्पष्ट केलं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह भय्याजी जोशी यांनी काल मुंबईत एका कार्यक्रमात मराठी भाषेबद्दल केलेल्या वक्तव्यावर विरोधी पक्षांनी विचारलेल्या प्रश्नाला मुख्यमंत्री उत्तर देत होते.

राज्यमंत्री जयकुमार गोरे यांनी आज विधानसभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत, आमदार रोहीत पवार आणि लय भारी या यूट्यूब चॅनलविरोधात हक्कभंग दाखल केला. आपल्याविरोधात चुकीचं वक्तव्य करुन बदनामी केल्याचा आरोप त्यांनी केला. याप्रकरणी सरकारने लक्ष घालून चौकशी करण्याची विनंती त्यांनी केली.
विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हक्कभंगाचे हे प्रस्ताव स्वीकारुन हक्कभंग समितीकडे पाठवणार असल्याचं सांगितलं.

****

दरम्यान, आज कामकाज सुरू होण्यापूर्वी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी निदर्शनं केली. मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह धनंजय मुंडे यांची छायाचित्रे झळकावून विरोधकांनी त्यांच्याविरोधात घोषणाबाजी केली तसंच कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्था मोडकळीस आल्याचा आरोप करत सरकारचा निषेध केला.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तराखंडच्या दौऱ्यावर असून, सकाळी त्यांनी मुखवा इथं गंगामातेची पूजा करून दर्शन घेतलं. त्यानंतर त्यांनी एका ट्रेक आणि बाईक रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. हर्षिलमधल्या एका सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होऊन त्यांनी उपस्थितांना संबोधित केलं. सीमावर्ती गावं 'शेवटची गावं' नाहीत, तर 'प्रथम गावं' आहेत, हा आमचा नवा दृष्टीकोन असल्याचं ते म्हणाले. २०१४ पूर्वी चारधाम यात्रेसाठी दरवर्षी सरासरी १८ लाख यात्रेकरू येत होते, आता हा आकडा ५० लाखांवर पोहोचला असल्याचं त्यांनी सांगितलं. पर्यटन क्षेत्राला विविध रूपे द्यावी लागतील आणि ते ३६५ दिवस सुरू राहिलं पाहिजे, उत्तराखंडमध्ये कोणत्याही काळात पर्यटन चालू राहिलं पाहिजे, असं पंतप्रधान म्हणाले.
उत्तराखंड सरकारने यावर्षी हिवाळी पर्यटन उपक्रमास आरंभ केला आहे. हजारो भाविकांनी आधीच गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथला हिवाळा ऋतूत भेट दिली आहे. धार्मिक पर्यटनाला चालना देणं, स्थानिक अर्थव्यवस्थेला गती देणं, गृहआतिथ्य, पर्यटन व्यवसाय यासह इतर उद्योगांना चालना देणं हे या कार्यक्रमाचं उद्दिष्ट आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प आज वेरूळ सभागृहात मांडण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना हा अर्थसंकल्प सादर करतील.

****

बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियानाच्या जनजागृतीसाठी बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीनं उद्या सात तारखेला जनजागृती बाईक रॅली काढण्यात येणार आहे. शहरातल्या छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलातून बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या हस्ते या रॅलीचं संध्याकाळी उद्घाटन होणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं येत्या दहा ते चोवीस मार्च या कालावधीत मराठवाड्यातल्या अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतल्या एकूण ३२० नवउद्योजकांसाठी विभाग स्तरावरचा उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आणि तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या मुख्य कार्यालयात हे प्रशिक्षण होणार असून यामध्ये सहभागी होणाऱ्या लाभार्थींचे, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव तयार करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातून वीस लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार असून, इच्छुक उमेदवारांनी संधीचा लाभ घ्यावा, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****